जात जनगणना : भारतावर 'सर्जिकल स्ट्राइक'

डॉ. आनंद तेलतुंबडे / अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे

मोदींनी पाकिस्तानवर हल्ला करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र त्यांनी जातीचे निर्मूलन करण्याऐवजी ब्रिटिश राजवटीतील अस्त्राचा वापर करून जातीला विभाजित करण्याचे ठरविले आहे.

२३ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'मिट्टीमे मिला देंगे' या धमकीवरून असे दिसून आले की, ते पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानवर मोठा सर्जिकल स्ट्राइक करतील; पण एका आठवड्याच्या शांततेनंतर ३० एप्रिल २०२५ रोजी जे घडले ते म्हणजे जात जनगणनेची त्यांनी घोषणा केली.

भारतीय जनता पक्षाचा जात जनगणनेला असलेला ऐतिहासिक विरोध लक्षात घेता, त्यांच्या या राजकीय यू-टर्नने संपूर्ण देशाला आश्चर्याचा धक्का दिला. तथापि, फारसे लक्षात न आलेले सत्य म्हणजे, हा पाकिस्तानवर नाही, तर भारतावरच केलेला अपेक्षेपेक्षा कितीतरी मोठा 'सर्जिकल स्ट्राइक' आहे. कोणत्याही हल्ल्याचे किंवा सर्वंकष युद्धाचे परिणाम मर्यादित काळासाठी असू शकतात, पण या 'स्ट्राइक'चा परिणाम अणुबॉम्बच्या किरणोत्सर्गाच्या दुष्परिणामांसारखा दीर्घकाळ टिकणारा असू शकतो.

इतिहासातील जात जनगणना :

१८५७च्या बंडामुळे भारतातील ब्रिटिश वसाहतवादी सत्ता पुरती हादरली होती. या उठावाने ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्यात अपयश आले असले तरी, वसाहतवादी राज्यकर्त्यांसाठी एक अत्यंत अस्वस्थ करणारी वस्तुस्थिती उघड झाली ती म्हणजे हिंदू आणि मुस्लिमांमधील एकतेची शक्यता, तसेच जातीय भेदभावांना ओलांडून दर्शवलेली एकजूट. या बंडात विविध प्रदेश, धर्म आणि जाती आणि कनिष्ठ जातींच्या लोकांनी सक्रिय सहभाग घेतला. हे केवळ एक लष्करी बंड नव्हते, तर वसाहतवादी सत्तेविरुद्ध एक राजकीय आणि सांस्कृतिक आव्हान होते, ज्याने भारतीय एकतेच्या मोठ्या शक्यतेचा संकेत दिला होता.

१८५७च्या बंडानंतर, ब्रिटिशांनी भविष्यात अशा प्रकारची एकजूट पुन्हा होऊ नये यासाठी एक सुनियोजित आणि दीर्घकालीन रणनीती आखली. या रणनीतीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जनगणना. या जनगणनेला त्यांनी भारतीय समाजाला विशिष्ट आणि अपरिवर्तनीय गटांमध्ये कायमस्वरूपी विभागण्यासाठी एक शक्तिशाली साधन म्हणून वापरण्यास सुरुवात केली. १८७१मध्ये ब्रिटिश भारतातील नियमित दहा वर्षांच्या अंतराने होणारी पहिली जनगणना सुरू झाली. त्यानंतर, १८८१ च्या जनगणनेमध्ये ब्रिटिशांनी संपूर्णपणे जातनिहाय आकडेवारी गोळा करण्यास प्रारंभ केला. या प्रक्रियेद्वारे, त्यांनी लोकांना त्यांच्या जातीच्या आधारावर ओळखले आणि त्यांची नोंद

केली, ज्यामुळे सामाजिक वर्गीकरण अधिक दृढ झाले. विशेष म्हणजे, ब्रिटिशांनी ज्याप्रकारे धर्माच्या आधारावर जनगणना (जी जातिगणनेसारखीच होती) केली तशाच प्रकारची स्वतंत्रपणे आणि विस्तृत स्तरावरची जनगणना २००१मध्ये प्रथमच करण्यात आली. या पूर्वी धर्म हा इतर सामाजिक वैशिष्ट्यांबरोबर एकत्रितपणे पाहिला जात असे. ब्रिटिशांनी केलेली ही जात आणि धर्मआधारित गणना त्यांच्या 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाचाच एक भाग होती, ज्याद्वारे त्यांनी भारतीय समाजात फूट पाडून आपली सत्ता अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला.

पीटर ड्रकर यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे "ज्याचे तुम्ही मोजमाप करू शकत नाही, त्याचे व्यवस्थापन तुम्ही करू शकत नाही," हे व्यवसाय व्यवस्थापनातील एक प्रभावशाली आणि वारंवार उद्धृत केलेले तत्त्व आहे. व्यवसाय प्रक्रिया किंवा कोणत्याही संस्थेच्या कार्याचे व्यवस्थापन आणि सुधारणा करण्यासाठी परिमाणात्मक मापनपद्धतीच्या महत्त्वावर जोर देते. धोरणे आणि कृतींचे प्रभावीपणे मूल्यांकन करण्यासाठी परिणामांचे मापन करणे महत्त्वाचे आहे. ही विचारधारा जनगणनेच्या रणनीतीचा मूळ उद्देश स्पष्ट करते.

ब्रिटिशांचा असा विश्वास होता की, भारतावर प्रभावीपणे शासन करण्यासाठी, त्यांना येथील लोकसंख्येला व्यवस्थित आणि समजण्यायोग्य अशा श्रेणींमध्ये वर्गीकृत करणे आवश्यक आहे. जात, धर्म, जमाती आणि भाषा हे केवळ वर्णनात्मक शब्द नव्हते, तर ती नियंत्रणाची साधने होती. त्यांची साम्राज्यवादी इच्छाशक्ती जेवढी राजकीय तेवढीच ज्ञानात्मकही होती. ब्रिटिशांना भारताविषयी जितकी जास्त माहिती मिळत गेली, तितकेच ते अधिक प्रभावीपणे राज्य करू शकले.

या ज्ञाननिर्मितीच्या प्रकल्पाला वसाहतवादी मानवशास्त्रज्ञ, प्रशासक आणि भारतविद्याशास्त्रज्ञांनी अधिकचे पाठबळ दिले. त्यांनी अनेकदा भारतीय इतिहास आणि समाजाचा अर्थ त्यांच्या स्वतःच्या वंश आणि संस्कृतीच्या उच्च-नीच श्रेणींच्या दृष्टिकोनातून लावला. एच. एच. रिस्ले यांनी त्यांच्या संशोधनातून, जाहीर केले की 'जात ही वंश आणि व्यवसायाची निर्मिती आहे,' जातीला वांशिक स्वरूप देण्याचा आणि एका वैज्ञानिक वर्गीकरणामध्ये निश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे जात, जी पूर्वी अधिक लवचीक आणि परिस्थितीनुसार बदलणारी सामाजिक बाब होती, ती एक कठोर आणि वारसाहक्काने मिळणारी ओळख बनली.

जाती जनगणना : विभाजनाचे साधन

जातीच्या या ताठरतेला संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले ते जनगणना या प्रमुख माध्यमाद्वारे. वसाहतवादी हस्तक्षेपापूर्वी, जात बऱ्याच प्रमाणात लवचीक आणि प्रादेशिक विविधतेसह अस्तित्वात होती. अनेक जातींमध्ये आर्थिक गतिशीलता, सामाजिक सहसंबंध किंवा सांस्कृतिक अनुकूलनाद्वारे स्वतःची पुनर्रचना करण्याची किंवा वर्गीकरण बदलण्याची क्षमता होती. परंतु एकदा ब्रिटिशांनी जातींची गणना आणि क्रमवारी सुरू केल्यावर, त्यांनी या ओळखींना श्रेणिबद्ध गटांमध्ये गोठवून टाकले.

- वसाहतवादी राजवटीने तयार केलेल्या जातींच्या याद्यांमुळे प्रशासकीय कामकाज, नोकरभरती, करआकारणी आणि सामाजिक स्थितीसाठीच्या अधिकृत नोंदी तयार झाल्या.
- 'शुद्धता' आणि व्यवसायाच्या आधारावर जातींची क्रमवारी लावल्यामुळे सामाजिक श्रेणीतील स्वतःच्या स्थानाबद्दल समुदायांमध्ये नवीन चिंता निर्माण झाली. ज्यांनी उच्च दर्जा प्राप्त करण्याचा किंवा प्रतिकूल वर्गीकरणाला विरोध करण्याचा प्रयत्न केला त्यांनी आता जातीवर आधारित चळवळी सुरू झाल्या.
- निकोलस डिर्क्स हे 'कास्ट्स ऑफ माइंड'मध्ये असा युक्तिवाद करतात की, 'ब्रिटिशांच्या काळातच जात ही एकच संज्ञा बनली, जी भारताच्या विविध सामाजिक ओळखी व्यक्त करण्यास, संघटित करण्यास आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'व्यवस्थित' करण्यास सक्षम झाली.'

त्याचबरोबर ब्रिटिश ऐतिहासिक कथेने मुस्लीम राजवटीला जुलमी ठरवले आणि हिंदूंना संरक्षणाची गरज असलेले बळी म्हणून स्थान दिले. पाठ्यपुस्तके आणि अधिकृत नोंदींमध्ये प्रचलित झालेल्या इतिहासाच्या या सांप्रदायिक विवेचनामुळे धार्मिक समुदायांमध्ये दरी

निर्माण झाली आणि आधुनिक सांप्रदायिकतेची बीजे पेरली गेली.

- जनगणना आणि ऐतिहासिक पुनर्विवेचन यांनी मिळून सांप्रदायिक आणि जातीनिहाय विभाजनाची दुहेरी रणनीती आखली.
- हिंदू आणि मुस्लीम यांना मूलतः विरोधी समाज म्हणून चित्रित करून सांप्रदायिकतेला संस्थात्मक स्वरूप देण्यात आले. भारतीय समाजाचे परस्परविशिष्ट आणि श्रेणिबद्ध गटांमध्ये विभाजन करून जातीला संस्थात्मक स्वरूप देण्यात आले.
- दोन्ही रणनीतींचा उद्देश १८५७ची पुनरावृत्ती रोखणे हा होता. प्रशासकीय नेमणुका असोत किंवा राजकीय मंच असो - मान्यता, संसाधने आणि प्रतिनिधित्वासाठी स्पर्धा निर्माण करून ब्रिटिशांनी आजही कायम असलेल्या विभाजनांना खतपाणी घातले.

जात जनगणना ही माहिती गोळा करण्याची एक वस्तुनिष्ठ कृती नव्हती; भारतीय समाजाचे तुकडे करण्यासाठी आणि वसाहतवादी राजवटीविरुद्ध सामूहिक एकत्रीकरण रोखण्यासाठी केलेले ते एक राजकीय साधन होते. नंतरच्या जातीआधारित चळवळी आणि न्यायाच्या दाव्यांसाठी त्यांनी शब्दसंग्रह (vocabulary) उपलब्ध करून दिला, परंतु सामाजिक विभाजने आणि ओळखी पुन्हा स्थापित करून असे केले, जे पुन्हा एकदा वाटाघाटीयोग्य होते. जनगणनेच्या वसाहतवादी प्रकल्पाने जातीला जिवंत, गतिमान ओळखीपासून स्थिर, प्रशासकीय श्रेणीत रूपांतरित केले आणि एकेकाळी समाज आणि लवचीकता सुलभ करणारी गोष्ट आता राजकीय आणि सामाजिक विभाजनासाठी वापरली जाऊ शकते याची खात्री केली.

जातीचे मजबूतीकरण, जातिनिर्मूलन नव्हे !

काही सुज्ञ अभ्यासक आणि समाजशास्त्रज्ञांच्या मते, जातिजनगणना करणे हे रुजलेली विषमता ओळखण्यासाठी आणि जातिभेद नष्ट करण्याच्या दिशेने एक पुरोगामी पाऊल असू शकते. सतीश देशपांडे यांच्यासारख्या अभ्यासकांनी असा युक्तिवाद केला आहे की, जातीचे नामकरण व मोजणी करून ती खुली करून वा उघड्यावर आणून तिला नष्ट केल्या जाऊ शकते. ज्यामुळे ती टीका आणि धोरणात्मक सुधारणांना दिसू शकते. तथापि, हा आशावाद भारतीय समाजातील जातीचे स्वरूप आणि अस्मितेवर आधारित जनगणनेच्या राजकीय वापराचा चुकीचा अर्थ लावतो. डॉ. आंबेडकरांच्या कल्पनेप्रमाणे, जातिनिर्मूलनाला कारणीभूत ठरण्याऐवजी जातजनगणनेमुळे जातजाणिवेला नवसंजीवनी मिळेल, जातीतील फूट वा विभाजन संस्थात्मक होईल आणि राजकीय वर्गाला जातिनिहाय संघटन आणि राजकारणासाठी एक मोठे भांडवल उपलब्ध होईल.

राज्यातील लोकसंख्येच्या जटील व विभिन्न समूहांना समजून घेण्यासाठी, त्यांना सुव्यवस्थित करण्यासाठी आणि त्यांच्यावर शासन करण्यासाठी जनगणना एक आकृतिबंध देतो. एखाद्या बाबीचे मोजमाप करणे म्हणजे त्यावर नियंत्रण ठेवणे होय. त्यांना मुक्ती वा स्वातंत्र्य देणे नाही किंवा त्यांना नष्ट करणे हे तर मुळीच नाही. ही वासाहतिक काळापासूनच चालत आलेली एक परंपरा आहे. कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुधारणा घडविणे हा या जनगणनेचा प्राथमिक उद्देश नव्हता. आपल्या सामाजिक ओळखीचा उपयोग प्रशासनाला सुलभ, प्रभावी आणि रचनाबद्ध करण्यासाठी होता. तिला संपवण्यासाठी वा नष्ट करण्यासाठी मुळीच नव्हता.

थोडक्यात, राज्याच्या द्वारे केली जाणारी जनगणना आणि वर्गीकरणाची प्रक्रिया ही एक दुधारी तलवारीसारखी आहे. एका बाजूला ती सामाजिक विषमतेला उजागर करण्यासाठी मदत करते; ज्यामुळे ध्येयधोरणाची निर्मिती केली जाऊ शकते तर दुसऱ्या बाजूला सामाजिक श्रेणीला अधिक स्थिर आणि अपरिवर्तनीय बनविण्याची शक्यता केली जाऊ शकते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. वसाहतवादी राजवटीच्या संदर्भात जातीय जनगणनेची आकडेवारी ही वास्तवाचे निष्क्रिय वर्णन नसून तिची सक्रिय निर्मिती होती. एकदा राज्याने नोंद केली आणि मान्यता दिली की, जाती ह्या नोकरशाहीच्या चौकटीत दर्जा, प्रतिनिधित्व आणि संरक्षणासाठी स्पर्धा करू लागल्या - ही गतिशीलता आजही सुरू आहे. जातीला कमजोर करणे तर दूरच, पण जनगणनेमुळे अनेक प्रकारे

जातजाणिवा बळकट होते.

- **स्वतःची ओळख धोरणात्मक बनते :** आरक्षणाच्या राजकारणाच्या संदर्भात व्यक्ती आणि समुदायांना लाभ मिळविण्यासाठी जातीची अस्मिता जपण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे जात ही भूतकाळाची वस्तू नव्हे, तर वर्तमानातील साधन बनते.
- **जात राजकीयदृष्ट्या विक्रीयोग्य बनते :** राजकारणी आपली निवडणूक रणनीती आखण्यासाठी जातजनगणनेच्या आकडेवारीचा वापर करतात. जातिनिहाय पक्षांचा प्रसार, उपजातींची जमवाजमव आणि उपआरक्षणाची मागणी (उदाहरणार्थ, ओबीसी प्रवर्गातील) हे सर्व बारीकसारीक लोकसंख्येच्या आकडेवारीवर आधारित आहे.
- **सामाजिक एकात्मता खंडित :** शोषितांमध्ये ऐक्य निर्माण होण्याऐवजी जातगणनेमुळे अनेकदा स्पर्धात्मक बळीची भावना निर्माण करते. राज्यमान्यता आणि फायदे मिळवण्यासाठी विविध समाज 'अतिमागास' या लेबलसाठी धडपडत असतात ज्यामुळे सामाजिक रचनेचे आणखी विभाजन होते.

परिणामी, जातींचेनिर्मूलन होण्याऐवजी जातींचा प्रसार होण्याकडे वाटचाल दिसून येते. जातींची गणना जातीच्या निर्मूलनाची पूर्वतयारी असू शकते, ही कल्पना एका उदारमतवादी गैरसमजावर आधारित आहे - की एखाद्या समस्येचे नाव घेतल्याने ती आपोआप सुटेल. तथापि, भारतीय संदर्भात, जिथे जात ही केवळ एक सामाजिक ओळखच नाही तर एक सखोल राजकीय आणि आर्थिक चलनदेखील आहे, तिथे गणना अनेकदा उलट परिणाम करते. ती ज्या विभाजनांवर टीका करू इच्छिते, त्यांनाच दृढ करते. जातिनिहाय जनगणना हा दस्तऐवजीकरणाचा तटस्थ प्रकार नाही; हा एक राजकीय हस्तक्षेप आहे ज्यामुळे जातिव्यवस्था कमकुवत करण्याच्या दशकांच्या कार्याला धोका निर्माण होऊ शकतो. जोपर्यंत जातिनिर्मूलनासाठी समांतर आर्थिक, वैचारिक आणि सांस्कृतिक संघर्षाचा लढा दिला जात नाही, तोपर्यंत जनगणनेमुळे ती अधिक बळकट होण्याचेच काम होईल.

सामाजिक न्यायाचे मृगजळ

जातीय जनगणनेच्या मागणीने अलीकडच्या काळात राजकीय जोर धरला असून, सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व आणि समन्यायी पुनर्वाटपाचा आग्रह धरला जात आहे. तथापि, ही संपूर्ण चर्चा सैद्धांतिक, व्यावहारिक आणि वैचारिक आव्हानांनी भरलेली आहे. जातीय जनगणनेवर रामबाण उपाय असण्याऐवजी, ती ज्या असमानता दूर करू इच्छिते त्या वाढण्याचा धोका आहे, ज्यामुळे जातीचे स्वरूप आणि भारतात सामाजिक न्याय मिळवण्याचे मार्ग चुकीचे समजले जातील.

१. जातगणनेची अशक्यता :

जात ही काही स्थिर किंवा सहजपणे वर्गीकरण करता येण्याजोगी बाब नाही. ती एक लवचीक, परिस्थितीनुसार बदलणारी आणि श्रेणिबद्ध सामाजिक ओळख आहे, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात अंतर्गत विविधता आढळते. मानववंशशास्त्रीय अभ्यासानुसार भारतात ४०,००० ते ६०,००० जाती, उपजाती आणि प्रादेशिक प्रकार असू शकतात. अशा गुंतागुंतीच्या सामाजिक वास्तवाला प्रमाणित सर्वेक्षण साधनांद्वारे पकडणे हे एक मोठे जिकिरीचे काम आहे. यासाठी कोणतीही सर्वमान्य वर्गीकरण पद्धती नाही आणि लोक वेगवेगळ्या संदर्भामध्ये - गोत्र, व्यवसाय, पंथ, प्रदेश किंवा नामाभिधानानुसार स्वतःची वेगळी ओळख सांगू शकतात.

अगदी १८८१मध्ये सुरू झालेल्या आणि १९३१पर्यंत चाललेल्या ब्रिटिशकालीन जनगणनेलाही या गुंतागुंतीचा सामना करावा लागला. जनगणना अधिकाऱ्यांनी वारंवार या 'संख्यात्मक गोंधळा'बद्दल तक्रारी केल्या, कारण अनेक समुदायांनी त्यांच्या सांस्कृतिक नावांचा वापर करून सामाजिक स्तरावर बढती मिळवण्याचा प्रयत्न करण्यासाठी जनगणनेचा एक राजकीय संधी म्हणून उपयोग केला. आजच्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील वातावरणात अशा दाव्यांमध्ये केवळ वाढच होईल.

२. सामाजिक-आर्थिक ओळख :

दुसरी अडचण म्हणजे जातीला सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक निर्देशकांशी जोडणे. जातीय जनगणनेमागील गृहीतक असे आहे की गणनेमुळे वंचिततेचे प्रकार ओळखण्यास आणि त्यानुसार धोरणे

तयार करण्यास मदत होईल. तथापि, भारतात राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (एनएसएस), पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे (पीएलएफएस) आणि अगदी सामाजिक-आर्थिक आणि जातीय जनगणना (एसईसीसी) २०११ द्वारे अशी आकडेवारी या पूर्वीच उपलब्ध आहे - मात्र अंतर्गत विसंगतीमुळे ही जातीची आकडेवारी कधीच जाहीर केली गेली नाही.

सामाजिक दबाव, आकांक्षित चुकीचे वार्तांकन आणि प्रशासकीय अपारदर्शकता यांनी भरलेल्या वातावरणात जातिनिहाय वंचिततेची अचूक आकडेवारी गोळा करणे आणि त्याचा सहसंबंध जोडणे केवळ सांख्यिकीय गोंधळास कारणीभूत ठरेल. एसईसीसी २०११ने स्वतः ४६ लाखांहून अधिक जातींची नावे असलेली आकडेवारी तयार केली त्यापैकी अनेक मानकीकृत नसलेली (अप्रमाणित) आणि एकमेकांमध्ये मिसळलेली होती - ज्यामुळे वर्गीकरण करणे अशक्य झाले.

३. जातीय एकात्मतेचे मिथक :

जात जनगणनेच्या युक्तिवादातील एक मूलभूत त्रुटी म्हणजे जातिअंतर्गत (इंट्रा-कास्ट) एकरूपतेचे गृहीतक. जातींना ऐतिहासिकदृष्ट्या गट म्हणून भेदभाव केला जात असला तरी ते अंतर्गतदृष्ट्या समान नाहीत. प्रत्येक जातीला- कितीही दडपले गेले तरी. आता एक उदयोन्मुख मध्यमवर्ग आहे, ज्याला आपल्या गरीब सदस्यांप्रमाणे असुरक्षिततेला सामोरे जावे लागत नाही. दलित, ओबीसी आणि आदिवासी अभिजनांच्या उदयातून हे स्पष्ट होते. ज्यांच्याकडे संसाधने आणि सत्तेवर प्रभुत्व आहे, तर मोठा वर्ग अजूनही गरीब आहे.

त्यामुळे केवळ जातीच्या अस्मितेवर आधारित पुनर्वितरणाचे कोणतेही धोरण व्यापक स्तरावर गरीबी किंवा असमानता दूर करण्याऐवजी जातींमधील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या पुढे गेलेल्या वर्गांना अधिक सक्षम करण्याची शक्यता आहे, आरक्षण हे शोषित समाजातील उच्चभ्रू वर्गाला लाभांची मक्तेदारी करण्याचे साधन बनू नये, या आंबेडकरांच्याच चिंतेचे प्रतिबिंब या टीकेतून उमटते.

४. आकडेवारी ते न्याय : केवळ शब्दांचा खेळ

आजकाल एक घोषणा वारंवार ऐकायला मिळते, ती म्हणजे 'ज्यांची लोकसंख्येत जेवढी संख्या आहे, त्यांना तेवढा हक्क मिळाला पाहिजे.' तथापि, हे केवळ आकर्षक वक्तव्य आहे, व्यवहार्य धोरणात्मक तत्त्व नाही. 'योग्य वाटा' कसा ठरवायचा? तो नोकऱ्यांमध्ये, शिक्षणात, राजकीय प्रतिनिधित्वात की कल्याणकारी योजनांमध्ये? तो केवळ संख्यात्मक प्रमाणानुसार असेल की ऐतिहासिक वंचनेनुसार? ज्या क्षणी प्रमाणानुसार लाभ देण्यासाठी जातींची क्रमवारी लावली जाईल, त्याच क्षणी स्पर्धात्मक बळी ठरण्याची आणि उप-कोट्यांसाठी आंदोलनांचे राजकारण - जसे की ओबीसींमधील 'अति मागासलेल्या' वर्गांसाठी - मोठ्या प्रमाणात वाढेल. ब्रिटिश प्रशासनाने केलेले जातिआधारित केलेले आरक्षणाचे खटाटोप. विशेषतः मद्रास प्रांतात, त्यांच्या सुनियोजित अंमलबजावणीनंतरही गट-आधारित हक्कांच्या विभाजक क्षमतेचे प्रदर्शन केले. आजचे राजकीय वातावरण तर अधिकच विभागलेले आणि अस्थिर आहे.

५. सक्षमीकरणाचा अभाव असलेला सार्वत्रिक दृष्टिकोन :

जात जनगणना प्रकल्पावरील सर्वांत गंभीर आक्षेप त्याच्या तांत्रिक दोषांवर नाही, तर दूरदृष्टीच्या अपयशावर आहे. आज कोणताही राजकीय पक्ष सार्वत्रिक गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा आणि उपजीविकेच्या हमीची मागणी करत नाही, जे खऱ्या अर्थाने गरीब लोकांना - मग ते कोणत्याही जातीचे असोत - वर आणू शकेल. त्याऐवजी, सामाजिक न्याय केवळ जातीच्या गणिताच्या शून्य - बेरीज खेळापर्यंत मर्यादित केला गेला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर,

- जर आपले ध्येय खऱ्या अर्थाने समानतेचे असेल, तर त्यासाठी संरचनात्मक बदलांची गरज आहे.
- याबरोबरच मोफत उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा नजिक असावी, जिथे सर्वांना सर्व प्रवेश समान असतील.
- सर्वांसाठी आत्मसन्मान आणि प्रवेश सुनिश्चित करणारी एक सार्वत्रिक सार्वजनिक आरोग्य व्यवस्था;
- कल्याणकारी मदतीबरोबरच रोजगार हमीद्वारे जमीन

आणि उपजीविकेची सुरक्षा असणे गरजेचे आहे.

हे जर उपलब्ध होत नसेल तर, जातिनिहाय जनगणना केवळ एक राजकीय साधन बनेल, तो धोरणात्मक उपाय होणार नाही. शेवटी, बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला दूरदृष्टीचा इशारा आठवतो. ते म्हणतात, "विसंगतीने भरलेले जीवन आपण किती काळ जगणार आहोत? आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात किती काळ आपण समता नाकारणार आहोत? तसे झाले, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणू, ही विसंगती आपण शक्य तितक्या लवकर दूर केली पाहिजे; अन्यथा संविधानाने इतक्या परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची रचना कदाचित टिकणार नाही, तिला विषमतेचे बळी ठरलेले लोकच सुरुंग लावतील." हा सारा विचार आजच्या अस्मिताकेंद्रित राजकीय चर्चेत पूर्णपणे हरवून गेला आहे.

(**मूळ इंग्रजी लेख** "Caste census: A surgical strike on India" फ्रंटलाईन या इंग्रजी नियतकालिकात ऑनलाईन वेब पोर्टलवर मंगळवार, ६ मे २०२५ रोजी प्रसिद्ध झाला आहे. मूळ लेखासाठी क्लिक करा.. https://frontline.thehindu.com/social-issues/social-justice/bjp-modi-caste-census-political-strategy-problems-controversy/article69545262.ece)

मूळ लेख - **आनंद तेलतुंबडे**

prescient2023@gmail.com